महा वितरण
अभय योजनेत 40 हजार प्रकरणांची तडजोड

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 13/१२/२०२४ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 02 ‖ RNI - MAHMAR51259 ‖ metrocity924@gmail.com

# एक देश, एक निवडणूक

## केंद्रीय मंत्रिमंडळाची विधेयकाला मंजुरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



देशात 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर आज (दि. १२ डिसेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.

एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास 'एक देश, एक निवडणूक' धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे. भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये 'एक देश, एक निवडणुकी'च्या आश्वासनाचा समावेश होता. शिवाय, 'रालोआ ३.०' सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या लक्ष्यपूर्तीमध्येही हे धोरण सामील करण्यात आले होते. सरकारने मंगळवारी (१७ सप्टेंबर) १०० दिवस पूर्ण केले असून त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने कोविंद अहवालाला मंजुरी दिली होती.

'रालोआ' सरकारमधील प्रमुख दोन घटक पक्ष जनता दल (संयुक्त) आणि तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) यांनी एक देश, एक निवडणूक धोरणाला आधीच



पाठिंबा दिला आहे. देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्यामुळे दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात, त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते, त्यामुळे विकासाची गती मंदावते, असा युक्तिवाद भाजपने केला आहे.

'एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७ मध्ये देशाला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे', असे मत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सप्टेंबर महिन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मांडले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 13/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शैक्षणिक सामंजस्य करार

## पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि दक्षिण कोरियातील क्वांगवून विद्यापीठ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे दक्षिण कोरियातील क्वांगवून विद्यापीठ जागतिक पातळीवर उत्कृष्ट, दर्जेदार, आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान शिक्षण देण्यासाठी नावलौकिक मिळवला आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) शैक्षणिक समूहातील संस्थेमधील विद्यार्थी, प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च शैक्षणिक संधी, संशोधन करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे असे मत दक्षिण कोरियाच्या क्वांगवून विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विभाग संचालक डॉ. सुंगवू बेंजामिन चो यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) आणि क्वांगवून विद्यापीठ यांच्या मध्ये नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे झालेल्या कार्यक्रमात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारामुळे पीसीईटी येथे कोरियन भाषा केंद्र, अल्प मुदतीचे पदविका अभ्यासक्रम, द्विपक्षीय संशोधन, कार्यशाळा आयोजित करण्यास मदत मिळणार आहे.




यावेळी वुई ब्रिंगच्या मुख्य कार्यकारी अधिकारी टीना चो, क्वांगवून विद्यापीठातील इलेक्ट्रिकल आणि बायोलॉजिकल फिजिक्स आणि प्लाझ्मा बायोसायन्स रिसर्च सेंटर विभागाचे प्रा. नागेंद्रकुमार कौशिक, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीईटी आंतरराष्ट्रीय संबंध, संशोधन सल्लागार डॉ. दिनेश अमळनेरकर व विविध विद्याशाखेचे विभागप्रमुख उपस्थित होते.

# CID परत येत आहे!




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुन्ह्याचा आणि गुन्हेगारांचा शोध घेणारा अत्यंत लोकप्रिय झालेला C I D हा शो सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन वर 21 डिसेंबर 2024 पासून पुनरागमन करण्यास सज्ज आहे. दर शनिवारी आणि रविवारी रात्री 10 वाजता त्याचे प्रसारण करण्यात येईल. शिवाजी साटम (A C P प्रद्युमन), दयानंद शेट्टी (दया) आणि आदित्य श्रीवास्तव (अभिजीत) हे कलाकार पुन्हा एकदा त्याच्या गाजलेल्या भूमिकेत दिसणार आहेत. एका दिलखुलास मुलाखतीत या शोच्या पुनरागमनाबद्दल, पुन्हा प्रेक्षकांसमोर येण्याबद्दल असलेला रोमांच दयानंद शेट्टीच्या बोलण्यातून व्यक्त झाला. त्याने सांगितले की, नव्या सीझनमध्ये जुन्या आठवणींचे क्षण असतील आणि नवीन, वेधक केसिस व बरेच काही असेल.

इतकी वर्षे आमच्याशी निष्ठावान राहिलेल्या आमच्या सगळ्या चाहत्यांविषयी मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. प्रेक्षकहो, तुमचे प्रेम आणि निष्ठा हाच या मालिकेचा प्रेरणास्रोत आहे. मला माहीत आहे की, तुम्ही या मालिकेच्या नव्या सीझनची उत्सुकतेने वाट बघत आहात. मी तुम्हाला वचन देतो, तुम्ही केलेल्या प्रतीक्षेचे फळ तुम्हाला मिळेल.

तुमचा उत्साह, तुमचे मेसेजिस आणि तुमचे समर्थन यामुळे इतकी वर्षे ही मालिका चालली आणि त्यानंतरही जिवंत राहिली. नवा सीझन देखील तसाच रोमांचक आणि मनोरंजक व्हावा यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे आणि आम्हाला आशा आहे की, हा सीझन देखील तुमच्या जीवनात आनंद, रहस्य आणि न्याय भावना घेऊन येईल. CID तुमच्यामुळेच परत येत आहे! असे त्यांनी सांगितले

CID सुरू होत आहे 21 डिसेंबर रोजी आणि दर शनिवारी आणि रविवारी रात्री 10 वाजता त्याचे प्रसारण करण्यात येईल सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरून!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 13/१२/२०२४
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# अभय योजनेत 40 हजार प्रकरणांची तडजोड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वडगाव मावळ : जिल्ह्यात शनिवार (दि. १४) रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालती मध्ये विज चोरीच्या 122 तर महावितरण अभय योजना 2024 अंतर्गत दाखल पूर्व चाळीस हजाराहून अधिक तडजोड युक्त प्रकरणे निवडण्यात आली आहेत, अशी माहिती पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी दिली. पुणे जिल्हा विधीसेवा प्राधिकरणामार्फत आयोजित राष्ट्रीय लोक अदालती मध्ये विज चोरी आणि थकबाकीची प्रकरणे पुणे शहर आणि जिल्ह्यातून दाखल प्रकरणे निवडण्यात आली आहेत. यामध्ये ग्राहकांना




तडजोडीच्या माध्यमातून विविध सवलती मिळणार आहेत. तरी ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी केले आहे. या योजनांमध्ये प्रामुख्याने वीज कायदा कलम 135 आणि 138 अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांचा समावेश आहे. विविध चोरी प्रकरणात कोर्टात दोषरोप पत्र दाखल नसेल तर लोक अदालती मध्ये ग्राहक दाखल पूर्व प्रकरणात तडजोड करू शकतात.

वीज चोरी प्रकरणात लोक अदालती मध्ये तडजोड केल्यास ग्राहकाला वीजबिलात दहा ते पंधरा टक्के सवलत मिळू शकते, जास्तीत जास्त ग्राहकांनी लोक अदालतिद्वारे विविध चोरीत फौजदारी आणि कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित प्रकरणात तडजोड करून मुक्त व्हावे, असे आवाहन प्रभारी जिल्हा न्यायाधीश वडगाव मावळ डि.के. अनभुले, सचिव सोनल पाटील आणि महावितरण यांनी केले आहे.

# श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी सोहळा

## सरसंघचालक डॉ.मोहनजी भागवत यांच्या हस्ते होणार उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी सोहळा 17 डिसेंबर ते 21 डिसेंबर 2024 या कालावधीत चिंचवड येथे साजरा होणार आहे. या निमित्ताने चिंचवड देवस्थान ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि चिंचवड ग्रामस्थांच्या वतीने धार्मिक कार्यक्रम व उपशास्त्रीय व सुगम संगीत, तसेच व्याख्यान, आरोग्य व रक्तदान शिबिरांसह विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संजीवन समाधी सोहळ्याचे यंदाचे ४६३ वे वर्ष आहे.**



याबाबतची माहिती ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी आज (गुरुवारी) पत्रकार परिषदेत दिली. त्यावेळी चिंचवड देवस्थानचे विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, जितेंद्र देव, केशव विद्वांस, ॲड. देवराज डहाळे, माजी महापौर अपर्णा डोके, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, मोरेश्वर शेडगे, अश्विनी चिंचवडे, सुरेश भोईर आदी उपस्थित होते.महोत्सवाचे उद्घाटन व सन २०२५ च्या दिनदर्शिकेचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या शुभहस्ते 17 डिसेंबरला सायंकाळी 5.30 वाजता होणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना मोरया भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

### पार्किंग साठी जागेचा प्रश्न मनपा निवडणूक झाल्या नंतर

मोरया गोसावी मंदिर परिसरात वाहतूक प्रश्न मोठा आहे मंदिर कडे पार्किंग व्यवस्था नाही ,पत्रकार परिषदेत माहिती देताना ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी पार्किंग व्यवस्थे संदर्भात सांगितले की मंदिराच्या पार्किंग साठी महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याबरोबर चर्चा झाली आहे तसे आम्ही महापालिकेला निवेदन ही दिले आहे परंतु महापालिका प्रशासन वतीने हा प्रशासकीय निर्णय असल्याने मनपा निवडणूक झाल्यानंतर निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधी मार्फत सदर पार्किंगचा निर्णय घेतला जाईल असे सांगितले.

### चिंचवड देवस्थान वतीने भक्तनिवास इमारत

चिंचवड देवस्थान वतीने चिंचवडमध्ये भक्तनिवासाची भव्य इमारत उभी करण्यात येणार आहे मंदिर ट्रस्टची सात गुंठे जागा मंदिरच्या आसपासची असल्याने येथे भक्तनिवास बांधण्यात येणार आहे यामध्ये एक मोठा हॉल कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी तसेच पार्किंग सुविधा व मंदिर ट्रस्टचे कार्यालय ही असणार असल्याचे विश्वस्त मंडळाच्या वतीने सांगण्यात आले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 13/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापालिकेच्या वतीने थोर देशभक्त शहीद बाबू गेनू यांना अभिवादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : शहीद बाबू गेनू हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक आणि धाडसी वीर होते, ब्रिटिश मालावरील बहिष्काराच्या चळवळीत १२ डिसेंबर १९३० रोजी महाराष्ट्रातील मुंबई शहरात ब्रिटिश माल वाहून नेणाऱ्या ट्रकला रोखण्यासाठी ते रस्त्यावर उतरले, त्यात त्यांच्या अंगावरून ट्रक गेल्याने ते शहीद झाले, अशा या भारतमातेच्या थोर सुपुत्राच्या प्रखर देशभक्तीचा वारसा सर्वांनी जोपासला पाहिजे असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहीद बाबू गेनू यांच्या शहीददिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कॉम्प्युटर ऑपरेटर दिलीप गुंड, मुख्य लिपिक विशाल जाधव, माया वाकडे, प्रशिक्षणार्थी ओंकार जाधव आदी उपस्थित होते.

थोर क्रांतिकारक बाबू गेनू यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील महाळुंगे पडवळ येथे झाला. ते स्वातंत्र्यपूर्व काळात नोकरी निमित्त मुंबईत वास्तव्यास होते. भारतीय स्वातंत्र्य आणि देशभक्तीने प्रेरित झालेले बाबू गेनू हे स्वतः परदेशी मालाचा भारतात वापर होऊ नये यासाठी आंदोलनात सहभागी झाले होते. त्यात ते शहीद झाल्याने देशभरात तेवत असलेली क्रांतीची ज्योत अधिक प्रज्वलित झाली. त्यांची प्रेरणा घेऊन हजारो देशभक्तांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले योगदान दिले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते साहित्य साधने वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : दिव्यांगांसाठी उभारण्यात येणाऱ्या दिव्यांग भवनाचा आणि साहित्य साधनांचा दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी वापर करावा असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि रांजणगाव येथील फियाट इंडिया ऑटोमोबाईल प्रायवेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत सीएसआर सक्षम उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कुत्रिम अवयव व साहित्य वाटप आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सस्टेनेबिलिटी अँन्ड गव्हर्मेंट रिलेशन्स तथा सीएसआर प्रमुख राकेश बावेजा यांच्यासह कर्णबधीर, पूर्णतः अंध, मतीमंद, अस्थिव्यंग, मेंदूचा पक्षाघात या प्रवर्गातील २६४ दिव्यांग विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

झालेल्या शिबिरात २६४ विद्यार्थ्यांना ५७७ साहित्य साधनांचे वाटप करण्यात आले. यामध्ये व्हील चेअर, ब्रेल कीट, श्रवनयंत्र, टीएलएम कीट, रोलेटर, सीपी चेअर, वॉकर, प्रोग्रामेबल स्मार्ट फोन, स्मार्ट केन कॅलिपर या साहित्य साधनांचा समावेश होता. ऑगस्ट महिन्यात झालेल्या साहित्य वाटप मोजमाप शिबिरात एकूण ३४७ दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी २६४ विद्यार्थ्यांना साहित्य साधनांची शिफारस करण्यात आलेली होती.

आयुक्त शेखर सिंह यांनी पिंपरी चिंचवड महापालिका ही दिव्यांगांच्या सोयीसुविधांसाठी सतत कार्यरत असणारी महापालिका असून दिव्यांगांसाठी




महापालिकेच्या वतीने विविध योजना राबविण्यात येतात असे सांगून उपस्थित शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले.

यासोबतच जिल्हा समन्वयक समावेशित शिक्षण विभागाचे दत्तात्रय खुटवड, सीएसआर फियाट कंपनीचे व्यवस्थापक अमोल फटाले तसेच विषयतज्ञ राजेंद्र पोळके, कविता ढोरे, तृप्ती धुमाळ तर विशेष शिक्षक संदीप भुजबळ, सचिन अवचिते, रेणुका बिडवई, मंगल गायकवाड, शैला भुजबळ, सोनम साळुंखे, सुजाता गायकवाड, रत्नमाला लोखंडे, जयश्री वाढे, रुपाली देशमुख, माधुरी देशमुख, शोभा मशिमनाळ यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीता बांगर यांनी, सूत्रसंचालन जालिंदर राऊत यांनी केले. तर उपस्थितांचे आभार फियाट कंपनीचे विभागीय व्यवस्थापक प्रदीप पाटील यांनी मानले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968